# राशिभविष्य- मे, २०२१.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

=============================================================**सूचना -**
**प्रत्येक राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेल्या त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून, श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. म्हणून आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**
==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि आणि हर्षल असून हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रविमुळे अनारोग्य, मनस्ताप, चिंता त्यामुळे थकवा, काही मंडळींना रक्तदाब किंवा हृदयविकार अशापैकी आजार होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक चिंता, वाढता खर्च, वित्तहानी, भांडणे, नेत्रविकार अशापैकी घटनांचा मनस्ताप[प सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. हर्षलमुळे स्वभाव लहरी, अस्थिर, चंचल असा घडणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तर या हर्षलमुळे स्वभाव अति अस्थिर व अविचारी होणे संभवते. हातून विचित्र आचरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. फटकळपणे बोलून समोरच्याचा अपमान होण्याची शक्यताही दिसते. जपा. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत शुक्र-बुध(वक्री)-राहू असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या धनस्थानी येत आहे. वक्री बुधामुळे दु:ख, मनस्ताप होणार असला तरी त्याच्यामुळे अर्थलाभ होणेही संभवते. राहुमुळे कौटुंबिक सुखसमाधान व अर्थलाभ होणार असला तरी राहूमुळे त्यात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. कौटुंबिक जीवनात काहीही कारणाने भांडणे, कलह होणे संभवते. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तबगारी घडेल. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे कुटुंबात कलह, भांडणे होणे संभवते. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. शिवाय तो अपघातकारक असून त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. काही मंडळींना त्वचारोग, काहींना रक्तविकार अशापैकी आजार त्रस्त करतील. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत शनि (वक्री) असून त्याच्यामुळे महिन्याच्या

पूर्वार्धात अविस्मरणीय घटना घडणे संभवते. हा शनि सर्वसाधारण्पणे शुभ असला तरी तो वक्री असल्यामुळे मनासारख्या घटना घडण्यात अडथळे, अडचणी, विलंब निर्माण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे इछाआकांक्षा पूर्ण होतील, काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. मित्रवाढ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. पण नेपच्यूनमुळे आर्थिक बाबतीत घोटाळे, विलंब, कुमार्गी मित्रांमुळे मनस्ताप सहन करावा लागेल व त्यामुळे नैराश्य येईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर श्रीगणेश अथर्वशीर्षाचे पठण करा. त्याशिवाय .दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम श्रीअश्विनीकुमाराभ्याम नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी " ओम अग्नये नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शुक्र - बुध (वक्री) - राहू असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात व्यय स्थानी असलेला रवि ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी येत आहे. त्यामुळे रवि ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच असणार आहे. त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात मन अस्वस्थ राहील. कसली तरी चिंता त्रस्त करील. हाती घेतलेल्या कामात अपयश येऊ शकेल. अकारण खर्च होईल. महिन्याच्या उत्तरार्धात नियोजित कार्यात अडथळे येणे, पीछेहाट होणे, असह्य मनस्ताप होणे, दुःख, भय, चिंता यांमुळे अनारोग्य होणे, थकवा येणे, काही मंडळींना रक्तदाबाचा आजार तर क्वचित कोणास हृदयविकार होणेही संभवते. राहूमुळे अपमान होणे संभवते. तसेच काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. वक्री बुधामुळे धननाश, कुसंगतीचा त्रास, मित्रद्रोह होणे, मनस्थिती अस्वस्थ, चंचल होणे संभवते. पण शुक्रामुळे मधून मधून काही मनोनुकूल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत मंगळ असल्यामुळे विविध कारणांनी आर्थिक चिंता त्रस्त करतील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. घसा, मान, दाढा, डोळे यांपैकी कसले तरी आजार सहन करावे लागतील. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे मन अस्वस्थ राहील. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह बौद्धिक क्षेत्र, शास्त्रीय संशोधन क्षेत्र, व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. नोकरीत वरिष्ठ अधिकारी कौतुक करतील. क्वचित कोणास मानसन्मानचा योग येणेही संभवते. येथील नेपच्यून

मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेला हर्षल प्रतिकुल असून त्याच्यामुळे सांपत्तिक अडचणी, शत्रुत्व निर्माण होणे, वाईट प्रसंग किंवा जिवावरचे प्रसंग येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर " श्रीशिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी " ओम ब्रह्माय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन-** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी अहंकारी, मानापमान फार असा होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास अकारण श्रम, दगदग कराल व त्यामुळे थकवा येईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थिती निर्माण झाल्यास असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, उत्तम आचरण घडेल, व्यवसायात सहकार्य लाभेल, मन उदार होईल, अंगी असलेल्या गुणांचा प्रभाव पडेल व क्वचित कोणास कीर्ती- प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अपेक्षाभंग होणे, क्वचित कोणास मोठा आजार होणे, असमाधानकारक घटना घडणे आर्थिक चिंता वाढणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असून हे दोन्ही ग्रह आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होतील व आध्यात्मिक प्रगती होईल. नेपच्यूनमुळे सूचक स्वप्ने पडतील व या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. गुरुमुळे सद्गुणांची वाढ होईल. प्रगतीच्या संधी प्राप्त होतील, प्रवासयोग येईल, व क्वचित कोणास कीर्ती- प्रसिद्धीही मिळू शकेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य चांगले राहील, व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. शासकीय नोकरदार मंडळींपैकी कोणास बढती, कोणास उच्च पद, कोणास अर्थलाभ होणेही संभवते. पण हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. शरीरपीडा होणे, मानभंग होणे, मन अस्वस्थ होणे, नैराश्य येणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे अशापैकी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण लाभस्थानी असणाऱ्या हर्षलमुळे सर्व काही निश्चित घडेलच याची शाश्वती देता येत नाही. उलट या हर्षलमुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. पण काही मंडळींना अर्थलाभ होणेही शक्य दिसते.

या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह आहेतच. वक्री बुध प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, नियोजित कार्यात अपयश, मानहानी होणे संभवते. पण शुक्र व राहू अनुकुल होतील व शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. राहूमुळे अर्थलाभ होईल, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल, पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यताही दिसते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी ओम नमः:शंकराय:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो गूढ अभ्यास, वेदान्त, उपासना आदींसाठी अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे या राशीच्या विवाहेच्छूना उशीरा विवाहयोग येईल. पण वृत्ती शांत ठेवील. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. पण येथील नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे शक्यतो जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका, बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून येथील रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या शासकीय सेवेत असणाऱ्या मंडळींच्या इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, हाती घेतलेल्या कामात यश मिळेल, मोठ्या अधिकारी मंडळींशी परिचय होईल, आर्थिक, सामाजिक दर्जा प्राप्त होईल, बढती, उच्च पद अशापैकी काही मिळू शकेल, त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल. आरोग्य उत्तम राहील व स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या व्यवसायात वाढ होऊ शकेल, प्रगती होऊ शकेल. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह असून दशम स्थानी असलेला रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या लाभस्थानी येत आहे. येथील बुध वक्री असल्यामुळे नोकरी-व्यवसायात अडथळे, अडचणी सहन करतच अपेक्षित यश व प्रगती करावी लागेल. धनलाभ, मित्रलाभ होणेही संभवते. शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, धनलाभ होणेही संभवते, ऐषारामाची साधने प्राप्त होतील व मन:शांती लाभेल. पण राहूमुळे

अधिकाराचा गैरवापर करून वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. जुगाराचा नाद असेल तर नुकसानच होईल. त्याशिवाय संततिविषयक चिंताही त्रस्त करील. जपा. या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो पूर्णपणे अशुभ होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होतील, नको इतका खर्च करावा लागेल, मानहानी होणेही संभवते, मनस्थिती अस्वस्थ राहील, व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडून मनस्ताप दिला जाईल. काही मंडळींना जुनी दबलेली प्रकरणे पुन्हा उकरली जाऊन त्याचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना आणि श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे व "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी " ओम सर्पाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे घरगुती जीवनात कोणाशी पटणार नाही. मनस्थिती चिंताग्रस्त राहील. शिवाय विषभयकारी केतू असल्याने या राशीच्या मंडळींनी खाद्य पदार्थांबाबत विशेष काळजी घ्यावी. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नये. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि आहे. तो शत्रुत्व निर्माण करणारा असून त्याच्यामुळे गैरसमजाने वाद, भांडणे होणे संभवते. त्याशिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरुमुळे या राशीच्या विवाहेच्छूंना विवाहयोग येणे संभवते. ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काही मंडळींना अर्थलाभ होईल; तर काहींना प्रवासाचे योग येतील. पण नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित संशोधन कार्यात प्रगती करणे व यश प्राप्त करणे शक्य होईल. पण रवि ग्रह उच्च राशीत असला तरी भाग्यस्थान त्याला अनुकुल नसल्याने

महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल. त्याच्यामुळे कसले तरी भय, चिंता त्रस्त करील. मानसिक ताण सहन करावा लागेल. मानहानी होणेही संभवते. घरी वडील व्यक्तींचा विरोध सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत गेल्यावर काही प्रमाणात अनुकुल होईल व शासकीय नोकरदार मंडळींपैकी क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान, हुद्दा प्राप्त

होईल. काही मंडळींचा आर्थिक दर्जा सुधारेल; तर काहींचा सामाजिक दर्जा सुधारेल. या राशीच्या दशम स्थानी महिन्याच्या प्रारंभापासून वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह आहेतच. येथील वक्री बुधामुळे मानसिक, कौटुंबिक सुखात थोडी बाधा येणे संभवते. शुक्रामुळे या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या प्रगतीत अडचणी, अडथळे, दु:खदायक घटना घडणे संभवते. मात्र तेथील राहू अनुकुल होईल व त्याच्यामुळे शासकीय नोकरदार मंडळींपैकी कोणास एखादे सत्तास्थान, अधिकार पद मिळू शकेल. कोणाचा सन्मान होणेही शक्य आहे. या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत मंगळ असल्यामुळे या राशीच्या काही नोकरदार मंडळींना कष्ट-परिश्रम सहन करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. तसेच मित्रांशी वितुष्ट येण्याचीही शक्यता दिसते. पण या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य दिसते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ ओम भगाय नमः “ मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ ओम आर्यमे नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा

.**(६) कन्या -** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे काही मंडळींना मनस्ताप सहन करावा लागेल तर काही मंडळींना मानसिक दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांच्या कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई निर्माण होणे संभवते. या राशीच्या मंडळींचा स्वभाव स्वार्थी, संशयी, व्यवहारी असा होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून व गुरु असे दोन ग्रह असून नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना फसवणुकीचा त्रास सहन करावा लागेल तर काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना अस्वस्थ करील. पण गुरु ग्रह या राशीच्या दशम स्थानास पूरक होईल. तसेच त्याच्यामुळे शारीरिक आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रविमुळे अनारोग्य, दु:ख, अपयश, संततिसुखात बाधा, भावनेच्या भरात भरकटत जाणे, मानसिक ताण असह्य होणे, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागणे, कशाची तरी भीती अस्वस्थ करणे अशापैकी घटना घटना घडण्याची शक्यता दिसते. हर्षलमुळे अपघात भय असल्याने सतत

काळजीपूर्वक सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी महिन्याच्या संपूर्ण काळात वृषभ राशीत वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह आहेतच. राहूमुळे काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. जन्मकुंडलीत अशुभ संबंध योग असेल तर गुन्हेगारी प्रवृत्ती बळावेल. जपा. वक्री बुधामुळे नियोजित कार्यातील अडचणी, अडथळे, दिरंगाई यांत भर पडेल. तसेच तीव्र स्वरूपाचे वाद, भांडणे होणे संभवते. पण शुक्र ग्रह अनुकुल असल्याने सुसंगती, गुरुकृपा, थोरकृपा, सुख, ऐषाराम प्राप्त होईल. काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्वतंत्र व्यवसाय करत असणाऱ्या मंडळींच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. तसेच वरिष्ठांशी वाद, भांडण होणेही संभवते.

काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ ओम आर्यमे नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असल्यामुळे गृह सौख्यात बाधा निर्माण होऊ शकेल. त्यामुळे मनस्ताप होऊन नैराश्य येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यूनमुळे मनस्थिती अति भावनाशील होईल. पण हा नेपच्यून गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. गुरु ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. प्रेमसंबंध असणारांचे प्रेमसंबंध दृढ होतील. त्याशिवाय अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून रवि ग्रह केंद्रस्थानी असला तरी फारसा अनुकुल होणार नाही. त्याच्यामुळे अनारोग्य, काही मंडळींना पोटविकाराचा त्रास, वेवाहिक जीवनात पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी अधिकारशाही आचरणाचा त्रास सहन करावा लागेल. हर्षलमुळे सुद्धा वैवाहिक जीवनात दोघांतही वाद, मतभेद, भांडणे, कोणाचे तरी लहरी आचरण अशापैकी कारणांनी

वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. त्याशिवाय ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांच्या भागीदारीतही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत वक्री बुध, शुक्र, राहू असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि या अष्टम स्थानी येत आहे. बुध ग्रह अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे तो फारसा यशदायक, सुखकारक होणे संभवत नाही. मात्र शुक्र पूर्णपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. काही मंडळींना फारसे परिश्रम करावे न लागता अपेक्षेपेक्षा जास्त अर्थलाभ होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि या अष्टम स्थानी येत असल्यामुळे प्रतिकुल होईल व मिळणाऱ्या सुखासमाधानात बाधा निर्माण होईल. म्हणून जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. राहूमुळेही काही मंडळींना अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो विचार मनातून काढून टाकावा. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत मंगळ असल्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे स्वभाव गुलहौशी, ऐषारामी असा होईल व सर्व सुख मिळेल. पण त्याच्यामुळे वाहनापासून धोका असल्यामुळे सतत सवधानतेने वाहन चालवा, सवधानतेने आचरण करा. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे काही या राशीच्या काही मंडळींना अपेक्षित नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल; पण तो वक्री असल्यामुळे अपेक्षित नोकरी वा आवडते कार्यक्षेत्र मिळण्यात अडचणी,अडथळे पार करावे लागण्याची शक्यता आहे. त्याशिवाय भावंडाविषयक एखादी चिंता त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांना स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार करावयाचे असतील तर ते अपेक्षेनुसार पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची

शक्यता आहे. जपा. नेपच्यूनमुळे घरगुती संबंधात गैरसमज, वाद, घोटाळे निर्माण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत रवि आणि हर्षल असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील, पण या रविमुळे या राशीच्या काही मंडळींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. हर्षलमुळे मनस्थिती अस्वस्थ, चंचल अशी होईल. तो शास्त्रीय संशोधन व उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना पूरक होईल. पण असे कार्यक्षेत्र असले तरी या राशीच्या मंडळींनी सतत खोल विचार करू नये. कारण त्यामुळे डोकेदुखी किंवा ,मेंदूविकार होणे संभवते. काही मंडळींना मुदतीचा ताप येणेही शक्य आहे, जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत वक्री बुध , शुक्र, राहू असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या सप्तम स्थानी येत आहे. बुध ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे दु:ख, भांडणे, वियोग अशापैकी घटना घडणे संभवते. शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, पण राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काही मंडळींच्या मनात कपटी विचार प्रबळ होतील, वाममार्ग धन मिळविण्याचा विचार प्रबळ होईल. पण या राशीच्या मंडळींनी मनावर ताबा ठेवून मनातून तो विचार काढून टाकावा. नपेक्षा अनर्थ होईल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या स्थानी आल्यावर तो केंद्रस्थानी येत असल्याने काही प्रमाणात भाग्योदयकारक होणार असला तरी तो अनारोग्यकारक होईल व त्यामुळे या राशीच्या बऱ्याच मंडळींना पोटविकाराचा आजार होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे उष्णताविकाराचे आजार होण्याची शक्यता आहे. त्याशिवाय हाडमोड होणेही संभवते. तसेच तो वीज-पाणी यांपासून धोकादायक असल्यामुळे विजेवर चालणारी उपकरणे काळजीपूर्वक हाताळा व जलप्रवास करू नका. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “ श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी :श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असल्यामुळे सतत आर्थिक चिंता त्रस्त करतील. मूळचे कर्ज असेल तर त्यात वाढ होणेही संभवते. काही मंडळींना कोर्ट प्रकरणांचा त्रास सहन

करावा लागेल. त्याशिवाय कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याचीही शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल. यात्रा, प्रवासाचे योग येतील. पण एखाद्या भावंडाकडून असह्य मनस्ताप दिला जाणेही संभवते. नेपच्यूनमुळे मनस्थिती भावनाशील होणे संभवते. अध्यात्माची आवड असणारांना व गूढ संशोधनात रस असणारांना आपल्या कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या काही भाग्यवंतांना परदेशगमनाचे तर काही मंडळींना जलप्रवासाचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत रवि आणि हर्षल असे दोन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, संततिविषयक चिंता, प्रिय जनांपासून फारकत अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत गेल्यावर अनुकुल होईल व दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. मन:शांती लाभेल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. पण या षष्ठ स्थानी महिन्याच्या प्रारंभापासून वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह आहेतच. बुध ग्रह अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी कार्यसिद्धी, धनलाभ होणार नाही व नावलौकिकही होणार नाही. शुक्रामुळे कितीही उच्च कलागुण असले तरी ते व्यक्त करण्याची संधीच मिळणार नाही. केवळ स्वतः:चे समाधान होते शक्य आहे. राहूमुळे हितशत्रूंवर विजय मिळविणे शक्य होईल. तसेच ज्यांचा इतर जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होतील. पण काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्याची चिंता त्रस्त करील. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी केतु असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी, चंचल , अस्थिर असा होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी अनारोग्याची चिंता त्रस्त करील. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील.

प्रवासात मनस्ताप सहन करावा लागेल. त्याशिवाय कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे स्थलांतर झाले तर असह्य अस्वस्थता येऊन नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह अनुकुल होईल व त्यामुळे उत्तम अर्थलाभ होणे संभवते. तसेच व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. कुटुंबात शुभ घटना घडतील. पण नेपच्यूनमुळे आर्थिक लाभात घोटाळे, अन्य आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची चिंता बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रविमुळे सर्व प्रकारच्या कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. त्यामुळे नैराश्य येईल. तसेच त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, अपघात, संततिविषयक चिंता, नोकरीत वरिष्ठांचा जाच अशापैकी घटनाही घडण्याची शक्यता आहे. हर्षलमुळे घरीदारी कोणाशीच पटणार नाही, वास्तुसुख लाभणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह आहेतच. बुध ग्रह प्रतिकुल असून वक्री अवस्थेत अधिकच प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे विचार करण्याची शक्तीच मंद होईल. संतति -स्त्रीपासून मनस्ताप सहन करावा लागेल. शुक्र ग्रह या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना अनुकुल होईल व त्यांना आपल्या कलेत प्रगती होत असल्याचे सुखसमाधान लाभेल. पंचम स्थानी असलेला राहू कमिशन, दलालीवर व्यवसाय करत असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण संततिसुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इजा होणे, अंगावर फोड येणे, ताप येणे, चोरी होणे, अपप्रचाराचा मनस्ताप होणे, अर्थहानी होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे अपेक्षित गोष्टीत यश मिळेल. अपेक्षित अर्थलाभ होईल, प्रवासाचे योग येतील व सर्व सुखोपभोग प्राप्त होतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ ओम विश्वेदेवाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु ग्रह शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, या राशीच्या लेखकांचे लेखन प्रकाशित होईल, बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना तो यशदायक होईल. नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल होईल व मानसिक संवेदना अति जलद होतील. त्यामुळे मनस्थिती उदास होणे संभवते. काहीजणांना नैराश्य येणेही शक्य आहे. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह अनुकुल होतील व रविमुळे आरोग्य सुधारेल, सर्व सुखाचेच होईल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वाचे कौतुक करतील, शासकीय नोकरदारांपैकी काहींना बढती तर क्वचित कोणास एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. हर्षलमुळे उच्च प्रकारची बौद्धिक शक्ती, स्मरणशक्ती व आकलनशक्ती प्राप्त होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह चतुर्थ स्थानी वृषभ राशीत येत आहे. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळणार असले तरी तो वक्री असल्यामुळे अल्प प्रमाणात अडचणी, अडथळे येण्याची शक्यता आहे. पण शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व ऐषारामात काळ व्यतीत कराल. ज्याची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून अपेक्षित अर्थलाभ होईल. पण येथील राहू अनिष्ट असल्यामुळे मिळणाऱ्या सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या चतुर्थ स्थानी आल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नोकरीत कार्यदिरंगाई, वरिष्ठांचा जाच, कौटुबिक त्रास, दु:ख, जरूरीपेक्षा अधिक खर्च होणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत मंगळ असून तो संततीचे दृष्टीने तापदायक होईल. मुले मनाविरुद्ध वागतील. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. काही मंडळींना स्थावरसंबंधी त्रास होणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना नोकरी सोडून नवीन काही स्वतंत्र व्यवसाय करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसा अविचार करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो आर्थिक दृष्ट्या प्रतिकुल होईल व त्यामुळे आर्थिक संकटे येतील सबब आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक व विचारपूर्वकच करा. काही मंडळींना अनारोग्याचा तर काहींना मानहानीचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे

पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत रवि व हर्षल असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह या राशीच्या मंडळींना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रविमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील, वित्तहानी होणेही संभवते. भांडणे होतील. त्याशिवाय काही मंडळींना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. हर्षलमुळे मनस्थिती अति चंचल, अस्थिर होईल व अविचाराने नको इतका खर्च होईल. हातून विचित्र आचरण घडेल व अकारण फटकळपणे बोलून समोरच्याचा अपमान कराल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत वक्री बुध, शुक्र व राहू असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या स्थानी येत आहे. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, अर्थलाभ होईल, नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील, क्वचित कोणास एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थानही मिळू शकेल. पण बुध ग्रह वक्री असल्यामुळे अधिक प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूपासून धोका होणे संभवते. शुक्रामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही ,मंडळींना भूमिलाभ तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. क्वचित कोणास एखादे मानाचे स्थानही मिळू शकेल. राहूसुद्धा अनुकुल होईल व त्याच्यामुळे मनाचा उत्साह वाढेल, मनस्थिती दिलदार होईल, हातून एखादे कर्तृत्व घडेल; पण काही कारणाने बंधुसुखात बाधा येणे संभवते. या

राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात कटकटी, भांडणतंटे, गैरसमज, असमाधानकारक घटना असे काही घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे "वरून कीर्तन, आतून तमाशा" अशा प्रकारचे ढोंगी आचरण घडणे संभवते. त्याचप्रमाणे या केतूमुळे संततिसुखातही काही कारणाने बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असल्यामुळे तो सर्वसाधारण्पणे शुभ असला तरी वक्री असल्यामुळे अडचणी, अडथळे पार करूनच आर्थिक लाभ होतील. पण संततीपैकी कोणास कसला तरी त्रास असल्यामुळे मन अस्वस्थ होईल. या राशीच्या व्ययस्थानी गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह अध्यात्म व समाजकार्य यांस अनुकुल व प्रगतिकारक होईल; पण त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास व अपेक्षाभंग होणे संभवते. तसेच प्रवासात मनस्ताप सहन करावा लागेल. म्हणून शक्यतो प्रवास करू

नका. नेपच्यूनमुळे चिंता व मानसिक व्यग्रता त्रस्त करील व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत

असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः: " मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी " ओम पूषाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====